

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved
Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES


VOL. 4 NO. 1 JAN. 2018 BOOK V
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

## SPECIAL ISSUE

On the Occasion of One Day National Conference On

# ROLE OF WOMEN IN INDIAN ECONOMIC EMPOWERMENT

27th January, 2018



*Editor*
**Dr. Minakshi B. Jadhav**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF ECONOMICS
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# CONTENTS



| No. | Title | Author | Page |
|---|---|---|---|
| 1 | बचतगट आणि महिला सबलीकरण | डॉ.शिवाजी भ.यादव | 07 |
| 2 | बचतगट आणि महिला सबलीकरण | डॉ.प्रमोद बा. बेरळीकर | 10 |
| 3. | भारतीय स्त्री विषयक कायदा - एक अभ्यास | प्रा. अरूणा गं. पोटे | 13 |
| 4. | बचत गट आणि महिला सबलीकरण -एक चिंतन | प्रा. मारुती अ.लोंढे<br>डॉ टी. एल. बारबोले | 15 |
| 5. | Unorganized Sector Of Retailing & Rural Women Empowerment | Mr. R. V. Shetgaokar | 17 |
| 6. | जीएसटी आणि भारतीय अर्थव्यवस्था | सहा.प्रा.ए.डी.मडावी | 21 |
| 7. | महिला सबलीकरण प्राचीन काळापासून आजपर्यंत | डॉ. भिसे नितीन हनुमंत<br>डॉ. शेळके मधुकर पिराजी | 25 |
| 8. | कृषी , उद्योग व सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ.वाय.बी.चव्हाण | 28 |
| 9. | महिला सबलीकरणात बचत गटाची भुमिका | डॉ. विश्वनाथ कंधारे | 31 |
| 10. | Role Of Women In Economic Development | Dr.Kamalakar D. Jadhav | 34 |
| 11. | Agriculture Sector In Indian Economy | Dr. Suhas Ganpat Gopane | 36 |
| 12. | भारतीय अर्थव्यवस्था आणि महिला सक्षमीकरण | डॉ. जाधव मिनाश्री भास्कर | 38 |
| 13. | बचत गट आणि महिला सबलिकरण | डॉ. खोंड सुरेश वसंतराव | 42 |
| 14. | महिला सक्षमीकरण आणि अर्थकारण | डॉ. अशोक पु. टिपरसे | 45 |
| 15. | **लघु आणि कुटीर उद्योगात महिलांचा सहभाग** | **डॉ .ढास .डी .के .** | 47 |
| 16. | Women's Entrepreneurial Participation in … | Dr. Pankaj B. Chaudhari | 50 |
| 17. | महिला सबलिकरण आणि शासकीय योजना | डॉ.नरसिंग भानुदास देशमुख | 58 |
| 18. | महिला सबलीकरणात बचत गटाची भूमिका | डॉ . महेश प्रभाकरराव देशमुख | 61 |
| 19. | ग्रामीण विकासात महिला बचत गटांची भूमीका | प्रा. यादव जे.बी | 64 |
| 20. | महिला सबलीकरणात स्वयंसहायता गटाची भूमिका | प्रा. खंडू म. नवखंडे<br>प्रा. ज्ञानेश्वर ए. खोजे | 67 |
| 21. | महिला व सामाजिक चळवळी | प्रा. सौ. कांबळे एस. पी. | 70 |
| 22. | भारत निर्माण कार्यक्रमाचा महिला सक्षमीकरणावरील प्रभाव | डॉ.वसंत दादारावजी पाटील | 73 |
| 23. | Self Help Group & Women Empowerment | Birajdar S.G. & Dr.Varshetti R. | 77 |
| 24. | जीवनोन्नती अभियान आणि ग्रामीण महिला सक्षमीकरण-एक आढावा | प्रा. शेळके सी.एस. | 80 |
| 25. | बचत गट आणि महिला सबलीकरण:एक दृष्टिक्षेप | श्री. परशुराम पाटील | 83 |
| 26. | महिलांच्या आर्थिक सबलीकरणात बचतगटाची भूमिका | प्रा.डॉ.मोरे अर्जुन मोहनराव | 85 |
| 27. | भारतातील महिला सबलीकरण आणि महिलांचे अधिकार | डॉ. संजय काळे | 87 |
| 28. | Role Of Self-Help Groups In Women Empowerment … | Dr. B.M.Ekukekar | 89 |
| 29. | साहित्य क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण २१ व्या शतकाच्या संदर्भात | प्रा. जाधवर शशिकांत श्री. | 91 |
| 30. | Women Empowerment In India : Fact And Tendency | Dr.G.L.Shendge & G.T.Pawar | 94 |
| 31. | भारतातील महिलांचे सक्षमीकरण | प्रा.डॉ.सतिश गव्हाणे | 96 |
| 32. | भारताच्या आर्थिक विकासात बचत गटांच्या माध्यमातून महिलांची भूमिका | प्रा.अदाटे नागनाथ म. | 99 |
| 33. | बचतगट आणि महिला सबलिकरण | प्रा. अनंत नरवडे | 102 |
| 34. | बचत गट आणि महिला सबलीकरण | निंबाळकर अनिल धु. ,<br>डॉ.भालेराव जे.एम. , डॉ. तिकांडे आर.पी. | 105 |

ISSN: 2454 5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

2.

# बचतगट आणि महिला सबलीकरण

**प्रा.डॉ.प्रमोद बालाजीराव बेरळीकर**
सहाय्यक प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

महिला सबलीकरणासंदर्भात सामाजिक, राजकीय, आर्थिक बाजू महत्वाच्या आहेत. पण महिला जोपर्यंत आर्थिक दृष्टीने सक्षम होणार नाहीत. म्हणून महिला सबलीकरणासंदर्भात आर्थिक बाजू ही महत्वाची आहे. प्राचीन काळात स्त्रीचे कार्यक्षेत्र हे चुल व मुल इतकेच मर्यादीत होते. तिचे जीवन हे चार भिंतीत बंदिस्त करण्यात आले होते. धर्म, जात, रुढी, प्रथा परंपरा इत्यादी तिच्यावर बंधने लादण्यात आली. म्हणून ती अर्थकारणात प्रवेश करू शकली नाही.

**महिला सबलीकरण म्हणजे काय :-**

१. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने विकास व प्रगतीची समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे सबलीकरण होय.
२. महिला सबलीकरण म्हणजे स्त्रीने स्वत:च्या क्षमतांची ओळख करून क्षमतांचा विकास करावयाच्या घरगुती व सामाजिक निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे.
३. कायदे व कल्याण कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व राजकीय अशा सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा हक्क प्रदान करून त्यांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करणे विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे, आणि त्यायोगे स्त्री-पुरुष असमानता कमी करणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केला आहे. संदर्भग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे, इंटरनेटवरून व विविध शोधनिबंधातून प्राप्त माहितीच्या आधारे प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. महिला सबलीकरणात अर्थकारणाची भूमिका समजावून घेणे.
२. महिला आर्थिक क्षेत्रात सध्या कुठे आहे याचा अभ्यास करणे.
३. ग्रामीण महिलांचा अर्थकारणकडे पाहण्याचा दृष्टिकोन अभ्यासणे.
४. महिलांच्या आत्मसन्मानाचा आणि आर्थिक स्वावलंबनाचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितके :-**

प्रस्तुत शोधनिबंधाची पुढील गृहितके गृहित धरली आहेत.

१. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होत आहे.
२. शिक्षणाच्या प्रवाहामुळे स्त्रियाचा अर्थकारणातील सहभाग वाढत आहे.
३. स्त्रीया आर्थिकदृष्टीने सक्षम झाल्यामुळे विविध व्यवसाय, उद्योगधंदे शसकीय व निमशासकीय नोकऱ्यामध्ये महिलांचे प्रमाण वाढतांना दिसून येते.
४. शासनाच्या विविध योजनामुळे स्त्री जीवनात आमुलाग्र बदल होत आहेत.

**विषय मांडणी :-**

सध्या स्त्रियांच्या कामाला बाजार मूल्य नाही. बाजारमूल्य म्हणजे वस्तू व सेवांना बाजारमूल्य (किंमत) असते. त्याचाच समावेश उत्पन्नात होतो. स्त्रीया घरची अनेक कामे करतात, पण त्याला किमत मिळत नाही. म्हणून स्त्रियांच्या घरकामाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करता येत नाही. उदा.एखाद्या व्यक्तीच्या पत्नीने भाडी धुने अशी कार्ये केली तर त्याला पैसा मिळत नाही. पण हीच कार्ये करण्यासाठी एखादी मोलकरीण लावली तर तिला रु.१०००/- वेतन द्यावे लागते. पण ही कार्ये पत्नीने केल्यास तिला मोबदला मिळत नाही. स्त्रीयांच्या घरकामाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावा किंवा नाही हा आज तरी चर्चेचा विषय आहे. स्त्रीयांना जेव्हा बाजारमूल्य केलेल्या कार्याला प्राप्त होईल तेव्हा स्त्रियांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**महिलांच्या आर्थिक सक्षमतेत बचत गटाची भूमिका :-**

बचत गट ग्रामीण व शहरी भागात महिलांना आर्थिक दुष्टीने सक्षम करताना दिसून येतात. आज देशात बचत गट आर्थिक सक्षमीकरणाबरोबरच स्त्रीयांच्या प्रश्नासंदर्भात सुध्दा चर्चा करताना दिसून येतात. बचत गटांच्या माध्यमातून शिक्षण आणि आरोग्याच्या प्रश्नावर महिलांना जागृत करणे. शिक्षणाचा दर्जा, पोषण आहार, ॲनेमिया अभियान, कुपोषण यासाठीही महिलांमध्ये जागृती घडवणं हे कार्य बचत गट करताना दिसून येतात.

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

आत्मसन्मान मिळविण्यासाठी आर्थिक स्वावलंबनाच्या वाटेवरून जावं लागतं हे भान तळागाळातल्या महिलांना दिलं ते बचतगटांनी खेड्यापाड्यातल्या, वाड्यावस्तीतल्या, गावकुसाबाहेरच्या अडाणी, अल्पशिक्षित बायकांना आम्हीही कोणीतरी आहोत ही ओळख बचतगटांनी दिली. एक रुपयाच्या बचतीमधूनही मी माझ्या घरासाठी काही करू शकते हे भान आल्यावर बायकांना बचतीचं वेड लागलं.

बचत गटामुळे महिला ग्रामीण भागात आर्थिक दृष्टीने सक्षम झाल्या. ग्रामीण भागात शेतीपूरक उद्योग सुरू झाले. शेतीत लागणारं खेळतं भांडवल हवं तेव्हा हातात मिळू लागलं. खासगी सावकाराकडून होणारी उसनवारी थांबली. अनेक ठिकाणी बायकांनी सामुहिक शेतीचे प्रयोग केले. उस्मानाबाद जिल्ह्यातल्या कोंडजीगडच्या महिलांनी तर शेतात गावतळ्याचं पाणी आणलं. थोडक्यात काय तर महिलांच्या आर्थिक सक्षमतेत बचत गटांची भूमिका महत्वाची आहे.

**तक्ता क्र.१**
**सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या माध्यमातून**
**महाराष्ट्रात निर्माण झालेल्या स्वयंसहाय्यता बचत गटाविषयी**

| बचत गट संख्या | महिला बचत गट |
|---|---|
| २ लाख ६७ हजार | २ लाख ३३ हजार |

बचत गटाच्या माध्यमातून संघटित झालेली ही स्त्री शक्ती किती प्रचंड आहे याची कल्पना येते. राज्यात महिला आर्थिक विकास महामंडळ, नाबार्ड, जलस्वराज्य प्रकल्प, नगरविकास विभाग, अल्पसंख्यांक विकास या विविध विभागामार्फत बचत गटाची स्थापना झालेली आहे.

**महिलांचा अर्थकारणातील सहभाग :-**

स्त्रियांच्या शिक्षणात वाढ झाली आहे. त्या स्वत:च्या पायावर उभा राहत आहेत. त्या नोकरी, व्यवसाय व उद्योग करून पैसा कमवू लागल्या आहेत. पण त्यांनी मिळवलेला पैसा खर्च करण्याचे स्वातंत्र्य किती स्त्रियांना आहे ही विचार करण्याची बाब आहे. नोकरी करायची अन् पगार वडिल किंवा नवऱ्याच्या हातात आणून द्यायची असेच चित्र समाजात मोठ्या प्रमाणावर दिसते. जेव्हा महिलांना मिळालेले उत्पन्न त्यांच्या इच्छेप्रमाणे खर्च करता येईल तेव्हाच तिचे आर्थिक सक्षमीकरण होईल.

भारत सरकारने महिलांना सक्षम होण्यासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. त्यात प्रामुख्याने नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे, रोजगार व प्रशिक्षण कार्यक्रम, राष्ट्रीय कर्ज योजना, पतपुरवठा प्रोत्साहन योजना,ग्रामीण महिला विकास योजना, महिला स्वयंसिध्द योजना, महिला उद्योजकासाठी कर्ज योजना, कस्तुरबा गाधी विशेष बालिका विद्यालय योजना, जननी सुरक्षा योजना, बालिका शिक्षण प्रसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वनिधीतून योजना, कामधेनू योजना, शुभमंगल सामुहिक विवाह योजना, जिजामाता महिला आधार विमा योजनातून महिलांचा अर्थकारणात सहभाग वाढतो आहे.

आज स्त्रिया सर्व क्षेत्रात वावरताना दिसून येतात. करीयर आणि कुटुंब या दोन्ही जबाबदाऱ्या त्या अतिशय उत्कृष्टपणे सांभाळत आहेत. आज स्त्रिया अनेक उद्योगात, अनेक व्यवसायात आहेत. कोणचाही पाठींबा नसताना देखील अनेक महिलांनी संघटित होऊन लघु व मध्यम उद्योग सुरू केलेले आहेत. त्यातून रोजगार निर्मिती सुध्दा होताना दिसून येते.

**शासकीय व निमशासकीय व राजकारणातील महिलांचे प्रमाण :-**

आजची स्त्री ही शिक्षणामुळे आत्मनिर्भर, स्वावलंबी, स्वतंत्र विचाराची बनत आहे. त्यातून शासकीय व निमशासकीय नोकऱ्यामध्ये व राजकारणामध्ये महिलांचे प्रमाण वाढताना दिसून येते. पण दुसऱ्या बाजूने एकुण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ५० टक्के असूनही प्रत्यक्ष राजकारणात सहभाग कमी आहे. ३३ टक्के जागा राखीव असल्या तरी प्रत्यक्षात सर्वच निर्णय हे पुरूषांकडून घेतले जातात. महिलांच्या प्रश्नाबाबतही निर्णय पुरूषांकडूनच घेतले जातात. खालील तालीकेत महिलांच्या प्रश्नाबाबतही निर्णय पुरूषाकडूनच घेतले जातात. खालील तालीकेत महिलांच्या राजकीय नेतृत्वाची आकडेवारी स्पष्ट केलेली आहे.

**तक्ता क्रमांक १.२**
**लोकसभेतील स्त्री सदस्य**

| अ.क्र. | लोकसभा | वर्ष | एकुण सदस्य | स्त्रीयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पहिली | १९५२-५७ | ४९९ | २२ | ४.४ |
| २. | दुसरी | १९५७-६२ | ५०० | २७ | ५.४ |
| ३. | तिसरी | १९६२-६७ | ५०३ | ३४ | ६.७ |
| ४. | चौथी | १९६७-७१ | ५२३ | ३१ | ५.९ |
| ५. | पाचवी | १९७१-७६ | ५२१ | २२ | ४.२ |
| ६. | सहावी | १९७७-८० | ५४४ | १९ | ३.४ |
| ७. | सातवी | १९८०-८४ | ५४४ | २८ | ५.१ |

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८. | आठवी | १९८८-९० | ५४४ | ४४ | ८.१ |
| ९. | नववी | १९९०-९१ | ५२९ | २८ | ५.३ |
| १०. | दहावी | १९९६-९८ | ५०३ | ३६ | ७.१ |
| ११. | अकरावी | १९९६-९८ | ५३७ | ३४ | ६.३ |
| १२ | बारावी | १९९८- | ५४४ | ४३ | ७.९४ |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, लोकसभेतील स्त्री सदस्यांची संख्या वाढत आहे.

**शोधनिबंधाचे निष्कर्ष :-**

प्रस्तुत शोधनिबंधातून खालील निष्कर्ष प्राप्त होतात.

१. बचत गटाच्या माध्यमातून महिलाचे आर्थिक सक्षमीकरण घडून येताना दिसून येत आहे.
२. शिक्षणाच्या प्रवाहामुळे स्त्रियांचा अर्थकारणातील सहभाग वाढत आहे.
३. स्त्रीया आर्थिक दृष्टीने सक्षम झाल्यामुळे विविध व्यवसाय, उद्योगधंदे, शासकीय व निमशासकीय नोकऱ्यामध्ये महिलांचे प्रमाण वाढताना दिसून येत नाही.
४. शासनाच्या विविध योजनामुळे स्त्री-जीवनात आमुलाग्र बदल होत आहेत.

**महिला अर्थक्षेत्रात सक्षम होण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना**

१. सर्वप्रथम स्त्री शिक्षणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. स्त्री-शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाला तरच लवकरात लवकर ती आर्थिक दृष्टीने सक्षम होवू शकेल.
२. महिलांना अर्थार्जन करणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी झाली पाहिजे.
३. महिला सक्षमीकरणासंदर्भात राबविल्या जाणाऱ्या योजनांची काळजीपूर्वक अंमलबजावणी झाली पाहिजे.

**संदर्भग्रंथ :-**

१. भारतीय उद्योजिका, प्रकाश बियाणी, मराठी अनुवाद सुवर्णा बेडेकर, इंदिरा प्रकाशन, २०१०
२. अल्पबचत नियोजन (बचतगट) प्रा.डॉ.एम.यू.मुलानी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, नोव्हेंबर २००८
३. मासिक :-
४. लोकराज्य - सप्टेंबर २००७, डिसेंबर २००७

❑❑❑